# प्रकरण पहिले

# साठोत्तरी मराठी वाङ्मयातील कथालेखनः आशय आणि आविष्कार

## प्रकरण पहिले

## साठोत्तरी मराठी वाङ्मयातील कथालेखन: आशय आणि आविष्कार

माणूस हा जन्मापासून गोष्टीवेल्हाळ प्राणी आहे. गोष्टी सांगण्याची व ऐकण्याची एक उत्सुकता मानवी मनात सतत चालू असते. लहानपणी आजी नातवाला गोष्टी सांगते. त्या सांगत असताना त्या बालकाला नीति शिकवण तसेच बोध, मनोरंजन करणे हाच हेतू होता. आपण लहानपणी ऐकत होतो त्या कथांमधून प्राण्यांच्या कथा मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. राक्षस, पऱ्या यांच्या अद्भूत कथा आपणास आवडतात. आपण जसे मोठे होतो तसे आपल्या आवडी बदलतात. प्रौढपणी आपण वास्तव जाणण्याचा प्रयत्न करतो. माणसांची सुख-दु:खे, त्यांचे जीवन याबद्दल आपल्या मनात उत्सुकता वाटते. आपल्याला जीवनदर्शन घडवणारी वास्तववादी कथा आवडू लागते. कथा हा प्रकार सर्वात जुना, सर्वात नवा वाङ्मय प्रकार आहे. "कथा हा एखादा कृत्रिम वाङ्मय प्रकार नसून तो मूलत: काही उपजत मानवी प्रवृत्तीशी निगडित असा एक जिवंत व मूलभूत वाङ्मय प्रकार आहे. या वाङ्मयप्रकारात लघुकथेचा जन्मक्रम शेवटचा लागतो." [१]

कथाकथनाची व निवेदनाची आवड ही माणसाची उपजत प्रवृत्ती आहे. भाषा हे कथेचे माध्यम आहे. या माध्यमाद्वारे माणसाने गोष्ट सांगण्यास सुरुवात केली. आपल्याला आलेला अनुभव मांडणे हा हेतू होता. ह्यासाठी आदिकालात जादूटोण्याच्या, भूता- खेताच्या, यक्ष-

किन्नरादिकांच्या देवकथा आल्या. प्राचीन काळी देव- दानवांच्या, असामान्य मानवांच्या कथा वेदांमधून आल्या. सुमेरियन लोकांच्या गिलगमेश महागाथेमधून आलेल्या दैवतकथा, धर्मग्रंथांतून, संतचरित्रांतून आलेल्या नीतिकथा महत्त्वाच्या आहेत. इसापनीती व पंचतंत्र या ग्रंथांत प्राणी कथा येतात. बॅलॅइस, कॅनिकल्स पोवाडे, लावण्या इत्यादी काव्य प्रकारांतून राज्यांच्या व वीरांच्या शौर्यकथा येतात. पूर्वी गावातील लोक गावच्या वडाच्या पाराशी वा शहरातल्या बाजारठाण्यावर या हकीकती रंगवून सांगत. तसेच "अरेबियन नाइट्स्" याच्या अद्‌भूत कथा बिरबल, तेनालीरामन यांच्या चातुर्यकथा, यातून माणसाने कथनाची हौस भागवून घेतली आहे. कथा वाङ्मयाची विभागणी तीन टप्प्यांत केली जाते.

१) आदिमानवी अवस्थेपासून प्रचलित मौखिक कथा.

२) अलिखित कथा (कथा वाङ्मयात अर्वाचीन लघुकथेच्या जन्मापूर्वीची ललित वाङ्मयाचा घाट देण्याचा प्रयत्न करणारी प्राचीन काळापासून आलेली लिखित कथा).

३) अर्वाचीन कथा.

मौखिक कथेसंबंधी फ्रांझ बोआस म्हणतो,

"प्रत्येक लोकसमूहाच्या कथा म्हणजे त्या त्या लोकसमूहाची वा राष्ट्राची आत्मकथाच होय." [२]

मौखिक कथेसंबंधी उपपत्ती पुढीलप्रमाणे: मॅक्समुल्लर या भाषा शास्त्रज्ञांच्या मते, दैवतकथा या भाषेच्या अशुद्ध व विकृत व्युत्पत्तीतून जन्मल्या आहेत. भाषेचा मूळ अर्थ विकृत झाला की त्यांना विकृत अर्थ मिळतो. त्यामुळे कल्पना बदलतात व त्या कल्पनांच्या कथा होतात.

लोककथांच्या मूलस्थानाविषयी साशंकता आहे. कथेचे संक्रमण होते. त्याचबरोबर कथेत बदलही होतात. पण कथाबीज मात्र एकच असते. हा कथेचा प्रवास ॲंड्युलॅग यांना मान्य नाही. त्यांच्या मते, जगापासून दूर असणाऱ्या जमातीमध्ये अशा प्रकारच्या कथा आहेत. उदा. एस्किमो जमात.

कथा अनेक प्रसंगांची मिळून बनलेली असते. यात सर्वात लहान घटकाला कथाबीज म्हणतात. कथेतील व कोणत्याही साहित्य कृतीतल्या या बीजरूप अंशाला कल्पनाबंध म्हणतात.

१) दैवतकथा- मानवी समाजाच्या आद्यतम कथा म्हणजे दैवतकथा. त्या दैवतकथा जगातील सर्व मानव समूहांत आढळतात. ईश्वर, भूतेखेते, पुनर्जन्म इत्यादी कल्पनांतूनच अनेक लोककथांचा उगम झाला.

२) परिकथा- रंजकता हा या कथेचा हेतू होता. परिकथेत दुष्ट सुष्ट प्रवृत्तीचा संघर्ष असतो. अंतिम विजय सुष्टाचा होतो.

## मराठी कथेचा विकास

कथेचा विकास प्रामुख्याने नियतकालिकांच्या माध्यमातून झाला. कथेला विशिष्ट रूप आणि वळण देण्याची कामगिरी नियतकालिकांतून संपादकांनी अधिक जाणीवपूर्वक पार पाडली. त्यामुळे 'करमणूक', 'मनोरंजन', 'रत्नाकर', 'यशवंत', 'किर्लोस्कर' ही मासिके आणि 'सत्यकथा' या नियतकालिकांचा हातभार कथाविकासासाठी लागला आहे. ''लहानांपासून थोरांपर्यंत सर्व स्त्री- पुरुषांचे मनोरंजन कसे घडणार होते यांचीही कल्पना देण्यात आली होती. आळीपाळीने दोन मोठ्या


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

गोष्टी व चार दोन अंकात संपणाऱ्या लहान चटकदार गोष्टी यांतून मनोरंजन करायचा प्रयत्न होता.'' [३] यातून या नियतकालिकांचा हेतू स्पष्ट होतो. मराठीतील कथा लेखनास प्रेरणा देण्याचे व त्या कथा वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य या मासिकांनी केले. या संदर्भात प्रामुख्याने चार कालखंड मानले जातात. ते पुढीलप्रमाणे-

१) करमणूक कालखंड (इ. स. १८९० ते १९१५)

२) मनोरंजन कालखंड (इ. स. १९१५ ते १९२५)

३) यशवंत ,किर्लोस्कर कालखंड (इ. स. १९२६ ते १९४५)

४) सत्यअभिरुची कालखंड (१९४५ पासून)

**करमणूक कालखंड (इ. स. १८९० ते १९१५)**

**हरिभाऊंची स्फूट गोष्ट**

हरिभाऊ कथाकार म्हणून नव्हे तर सामाजिक,ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून मराठीत ओळखले जातात. त्या काळात 'लघुकथा' हा शब्दही रूढ झाला नव्हता. तरीपण हरिभाऊंच्या 'स्फूटगोष्टी' ने काही प्रमाणात का होईना त्यांच्या काळावर ठसा उमटविला ; आणि वाचकांच्या अपेक्षा पूर्ण केल्या. हरिभाऊंनी केलेल्या कथांमध्ये दीर्घकथा (उदा. पाडव्याला भेट, थोड्या चुकीचा घोर परिणाम) लिहिल्या. त्याचबरोबर ऐतिहासिककथाही लिहिल्या. (उदा. मराठ्याचा शब्द, रजपुताचा अभिमान इ.) रहस्यमय कथांमध्ये 'भुताटकीचे घर' सारखी कथा येते. विनोदी कथा हा प्रकारही हाताळलेला दिसतो. (उदा. डिस्पेप्सिऱ्या, खाशीतोड इ.)

''हरिभाऊंच्या स्फूटगोष्टींना मराठी लघुकथेची गंगोत्री म्हटले

जाते.'' [४] हरिभाऊंची स्फूटगोष्ट ही अद्‌भूत स्वरूपाच्या कहाणीपासून वेगळे रूप आणि आकार धारण करू लागली. तिच्या ठिकाणी जुनी बोधप्रधान दृष्टी कायम राहिली. तरी वास्तव जीवनाचे वर्णन करण्याची ओढ तिच्यात निर्माण झाली.

**२) सहकारी कृष्ण**

हरिभाऊंप्रमाणेच लोकजागृतीचा उद्देश समोर ठेवून सहकारी कृष्ण यांनी कथा लिहिल्या. 'कजाग सासू', 'संसार की नरकवास', 'इकडचे प्रोफसर व युरोपियन प्रोफेसर यांच्यातील भेद', 'अनाथ बालिकाश्रम व त्यांची व्यवस्था', 'चहागृहे' इत्यादी कथांतून सहकारी कृष्ण यांनी लोकजागृतीचा प्रयत्न केला. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा व अनिष्ट रूढींविषयी वाचकांच्या मनात घृणा उत्पन्न करण्याकरिता सज्जनांचा जय व दुर्जनांचा नाश हा ठोकळेबाजपणा त्यांच्या कथेत आला.

'करमणूक' कालखंडात हरिभाऊंच्या बरोबरीने इतर लेखकही कथालेखनाचे कार्य करीत होते. कृ. के. गोखले, ना. के. बेहरे, वा. गो. आपटे आणि काशीताई कानिटकर, लक्ष्मीतनया, आनंदीबाई शिर्के, वामनसुता या स्त्री लेखिकाही यातून पुढे आल्या. लक्ष्मीतनया यांच्या कथेवर हरिभाऊंच्या कथेचा विशेष प्रभाव आहे. लक्ष्मीतन यांचा 'सद्यःस्थिती' व आनंदीबाईंचा 'कथाकुंज' हे करमणूक कालखंडातील प्रकाशित कथासंग्रह आहेत.

**मनोरंजन कालखंड (इ. स. १९१५ ते १९२५)**

मनोरंजनाच्या छत्राखाली अनेक नवनवे कथाकार, कवी एकत्र आले. संपादक मित्र, सहसंपादक गुर्जर, रेंदाळकर, श्री. कृ. कोल्हटकर,

वा. म. जोशी, वैजनाथ राजवाडे, डॉ. गुणे हे ज्येष्ठ लेखक होते. 'यत्र नार्यस्तू पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता :' हे ब्रीदवाक्य मनोरंजनाचे होते. हे कथेच्या विकासाला पोषक ठरलेले मासिक होते. या मासिकाने कथा विशेषांक काढले. दिवाळी अंकांची प्रथा चालू केली. त्याचबरोबर कथेची भाषांतरे केली. वि. सी. गुर्जर, दिवाकर कृष्ण यांसारखे कथाकार या कालखंडात होऊन गेले.

## १) वि. स. गुर्जर

१९१० पासून करमणुकीच्या स्फूट गोष्टीच्या पार्श्वभूमीवर गुर्जरांनी कथा लेखनास प्रारंभ केला. प्रभातकुमार मुखर्जी या बंगाली लेखकाचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांनी ६०० कथा लिहिल्या. सुखद रहस्य, गुंतागुंत आणि गोड शेवट हा रचनेचा क्रमही त्यांनी अवलंबलेला दिसतो किंबहुना, गोड योगायोग घडवून आणणे व वाचकाला आश्चर्याबरोबर आनंदाचा धक्का देणे हे त्यांच्या कथेचे सूत्र दिसते. जुन्या कुटुंब व्यवस्थेत शिक्षणाने घडून येणारा बदल ध्यानात घेऊन त्यांनी नवविवाहित पति-पत्नींच्या प्रेमाचे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या छोट्या समर प्रसंगांचे चित्रण केले आहे. वाचकाची उत्कंठा सतत वाढवीत नेऊन शेवटी कथानकाला अनपेक्षित कलाटणी देण्याचे तंत्र त्यांच्या कथेत दिसून येते. व्यक्तिचित्रणातील रेखीवपणा व भावनांची व्यापकता या बाबतीत त्यांच्या कथेला मर्यादा पडल्या. (उदा. 'ध्रुपदधमार', 'लाजाळूचे झाड', 'योगदर्शन', 'दिपोटी', 'प्रेम आणि मरण' इत्यादी) त्यांच्या कथा महत्त्वाच्या आहेत.

## २) ना. ह. आपटे

नारायण हरी आपटे हे कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध असले, तरी कथा क्षेत्रात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. 'बनारसी बोरे' या कथासंग्रहातील बऱ्याच कथांमध्ये लेखनाचा हेतू बोध ठसविणे हा आहे. ना. ह. आपटे जाणीवपूर्वक व परिश्रमपूर्वक कथालेखन वेगवेगळ्या विषयांवर व वेगवेगळ्या पद्धतीतून करत होते.

उदा. 'माळावरचा म्हसोबा' ही कथा या दृष्टीने महत्त्वाची आहे. ना. ह. आपटे यांच्या कथा सामाजिक , रहस्यमय, ऐतिहासिक, रूपांतरित आहेत. कौटुंबिक जीवन, नाट्यपूर्ण रचना, अनपेक्षित वळण देऊन ते कथा संपवतात.

उदा. 'संशयाचे कोलीत', 'डाकिणीचा चौक', 'पयोष्णी स्वयंवर' इत्यादी कथा यादृष्टीने पाहता येतील.

## ३) वा. म. जोशी-

मराठीत पहिली समस्याप्रधान कथा लिहिली ती वा. म. जोशी यांनी. वामन मल्हारांनी छांदिष्ट माणसांच्या काही विनोदीकथा लिहिल्या. उदा. नाटकराव, नाव बदलीन, आश्रमहरिणी इ. श्री. जोशी यांच्या कथेतच नव्हे तर त्यांच्या एकूण वाङ्मयात सात्त्विक स्त्री प्रतिमा चित्रित झालेली आहे.

## ४) शि. म. परांजपे-

'काळ' कर्ते म्हणून ओळख असणारे शि. म. परांजपे यांनी राजकीय कथा लिहिल्या. ब्रिटिश साम्राज्यावर हल्ला करण्यासाठी

निबंधाप्रमाणे कथेचा वापर केला. उदा. 'एका खडी फोडणाऱ्याची गोष्ट'. त्यांनी कथेत औपरोधक शैलीचा आणि संस्कृत प्रचुर कल्पनाविलासाचा उपयोग केला. स्वाभिमानाची चाड, फंदफितुरीचा धिक्कार, विचारविन्मुख लाचार माणसे हे त्यांच्या राजकीय कथांचे विषय आहेत. उदा. 'एका गिरणी कामगाराची गोष्ट', 'एक कारखाना' इ. कथा महत्त्वाच्या आहेत.

**५) न. चिं. केळकर-**

शि. म. परांजपे यांच्या काळात लेखन करणारे न. चिं. केळकर हे एक महत्त्वाचे कथाकार होत. न. चिं. केळकरांची कथा ही मंदप्रकाश देणारी वाटते. त्यांच्या कथेचे सर्वचगुण सौम्य व रंजक आहेत. त्यांनी राजकीय मतप्रदर्शन केले. 'शेवटचे लढाऊ जहाज', 'म्हणा स्वराज्य मतदार की जय' या त्यांच्या कथांतून राजकीय परिस्थितीवरचे भाष्य आले आहे. 'मौजेचे चार प्रहर', 'कुशा- निशा व इतर गोष्टी' या दोन कथासंग्रहांत मनोरंजनाचा हेतू समोर ठेवला आहे हे दिसते.

केळकरांप्रमाणेच मनोरंजनाचा हेतू समोर ठेवून श्री.कृ.कोल्हटकरांनी कथा लिहिल्या. उदा. 'गाणारे यंत्र','पति हाच स्त्रीचा अलंकार', 'संपादिका' आणि 'गरीब बिचारे पाडस' या कथा संग्रहांतून त्यांचा मनोरंजनाचा हेतू स्पष्ट दिसतो.

**७) दिवाकर कृष्ण-**

दिवाकरांच्या कथा म्हणजे मनोरंजन कालखंड आणि त्यापुढील लघुकथेचा सुवर्ण कालखंड यांना जोडणारा सुवर्णमध्य आहे. त्यांचा 'समाधी व इतर गोष्टी' हा कथासंग्रह १९२७ साली प्रसिद्ध झाला आणि

मराठी 'गोष्टीचे' मराठी 'लघुकथेत' रूपांतर झाले. जी गोष्ट 'श्रवणीय' होती, ती 'वाचनीय' बनू लागली. दिवाकरांनी मराठी कथा गोष्टीपासून बरीच मुक्त केली. वाचकांना अंतर्मुख करायला लावणाऱ्या कथा हे खास वैशिष्ट्य दिवाकर कृष्णांच्या कथेत जाणवते. तसेच मनोदर्शनालाही महत्त्व अधिक आहे. उदा. 'अंगणातील पोपट' ही कथा. रचनेतील बंदिस्तपणा, रंजक अथवा चमत्कृतिजनक घटनेऐवजी नाजूक भावनेला मिळालेले प्राधान्य, गीताच्या सुरांनी त्यातील अर्थाचा परिपोष करावा तशी कथेतला रस वाढवीत नेणारी भाषाशैली ही दिवाकर कृष्णांची वैशिष्ट्ये आहेत. दिवाकरांचा पिंड हा सौंदर्यपूजक कवीचा असल्याने कथेतही तरल काव्यात्मकता पदोपदी आपणास आढळते. उदा. 'दण्डकारण्यातील प्रणयिनी' ही कथा.

या वरील कथांचा विचार करता या कथांची पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात. काव्यात्मक शैली, तरल वातावरण, भावनांचे हळुवार चित्रण इत्यादी. 'वेड्याची कहाणी', 'मृणालिनीचे लावण्य', 'समाधी व इतर गोष्टी' या कथासंग्रहांतील पात्रे भावनाप्रधान, आत्मरत आणि व्यवहाराच्या धकाधकीत न टिकणारी अशी आहेत.

मनोरंजन कालखंडात मराठी कथा बाल्यावस्थेत असली तरी तिची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत गेल्याचे दिसते. या कालखंडात 'संपूर्ण गोष्ट' लोकप्रिय झाली. तरी ती संग्रहरूपाने फारशी लोकांच्या नजरे समोर येऊ शकली नाही. मनोरंजन बरोबरच नवयुग, चित्रमय जगत, उद्यान इ. मासिकांनी मराठी कथेचा विकास करण्यास हातभार लावला.

**मराठी लघुकथेचा विकास-**

'करमणूक' काळात सुरू झालेली कथा 'मनोरंजन' काळात बहरात आली. तिचे स्वरूप विविध आणि विपुल झाले. वाचकांच्या संख्येतही वाढ झाली. 'मनोरंजन', 'भारत गौरव', 'कुटुंबमाला', 'सुरसग्रंथ' या कथामाला सुरू झाल्या. भाषांतरामुळे हे वाङ्मय आणखी समृद्ध झाले. केवळ रंजन करणे हाच या कथेचा हेतू होता. कथेच्या तंत्राचा विचार केला नव्हता. मोपासॉ, चेकॉव्ह, ओहेनी ही नावे कानावरून गेली असली तरी त्यांच्या तंत्राकडे कोणाचे लक्ष गेले नव्हते. प्रभातकुमार मुखर्जींच्या 'रहस्य कथा' हा या काळातील मराठी कथेचा आदर्श होता.

या काळात लघुकथा विकसित होण्याचे कारण आणखी एका दृष्टिकोनातून पाहता येते. पहिल्या महायुद्धाचे परिणाम ओसरू लागले होते. राजकारणातील टिळकांच्या पंथीयांची उग्रता कमी झाली व म. गांधींचे सहिष्णुता, सहकार्य, सत्याग्रह यांचे राजकारण सुरू झाले. फ्रॉईडप्रणित मनोविश्लेषणाकडे लक्ष वळले.

'यशवंत', 'किर्लोस्कर', 'प्रतिभा' या मासिकांतून लघुकथेला प्राधान्य देण्यात आले. १९२५-४५, १९२६-४६ हा कालखंड म्हणजे लघुकथेचा कालखंड मानला जातो. 'मनोहर', 'कला', 'संजीवनी' इ. मासिके सुरू झाली. मराठी कथेच्या विकासात फडके- खांडेकर यांच्या कार्याचा फार मोठा वाटा आहे. यातील जीवनवाद आणि कलावाद यांनी वाचकांना समन्वयाचे समाधान मिळवून दिले. प्रा. फडके यांनी लघुकथेच्या तंत्राचा विचार मांडला. 'प्रतिभा साधन' या ग्रंथात त्यांनी 'शक्य तितक्या परिणामकारक रितीने आणि शक्य तितक्या कमी

पात्रांच्या साहाय्याने सांगितलेली एकच एक गोष्ट म्हणजे लघुकथा' अशी लघुकथेची व्याख्या केली. लघुकथेत आरंभ, शेवट हे दोन महत्त्वाचे बिंदू आहेत. उत्कंठा आणि विस्मय यांचे कथेत असाधारण महत्त्व आहे हे सांगितले.

''कथाकारांनी त्याच्या जगण्याच्या उत्कट ऊर्मींना, मनोवस्त्रांना, क्षणांना महत्त्व दिले. हे करणे, कादंबरीपेक्षा लघुकथेला अधिक शक्य असते. म्हणूनच परिवर्तनाच्या खुणा काव्यात व लघुकथेत आधी उमटलेल्या दिसतात.''[५]

**फडके- खांडेकर कालखंड-**

ना. सी. फडके हे या काळातील एक महत्त्वाचे कथाकार होत. १९१३ साली त्यांनी 'मेणाचा ठसा' ही पहिली कथा लिहिली. १९२५ च्या आसपास लेखनास सुरुवात केली. ते १९४५ पर्यंत कथाक्षेत्रात सतत आपले अधिराज्य गाजवीत राहिले. 'प्रतिभा साधन' या ग्रंथात ते लिहितात, ''वाचकांच्या मनावर विपुल संस्कार करणे हा लघुकथेचा हेतूच नव्हे. वाचकांच्या मनावर एकच एक संस्कार उत्कृष्ट तऱ्हेने करणे हे लघुकथा लेखकाचे ध्येय असावयास पाहिजे.''[६] फडके यांचे 'गुजगोष्टी: भाग १ व २', 'लीला आणि इतर गोष्टी','अभ्यंगस्नान', 'नमुनेदार गोष्टी', 'उल्हास कथा' इ. कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. सुटसुटीत संवादांतून त्याच्या खेळकर भाषाशैलीत एक लय उत्पन्न झाली. कथेची सुरुवात आकर्षक आहे. त्यात शब्दांचा साधेपणा व वाक्यरचना यातून डोकावणारा मिस्किलपणा येतो. फडक्यांच्या बरोबर वि. स. खांडेकर यांचे लेखन महत्त्वाचे आहे. फडक्यांनी जसा मराठी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वाङ्मयात कलावाद रुजविण्याचा प्रयत्न केला, तसा खांडेकरांनी जीवनवाद रुजविण्याचा प्रयत्न केला. फडक्यांच्या कथा उन्मादक प्रणयाच्या चित्रणातून भावनांचे चित्रण करतात असा आरोप केला जातो. तर खांडेकरांच्या कथांत समाजातील रंजल्या गांजल्यांच्या मूक-भावनांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला आहे. 'फाटका शर्ट', 'लपविलेले अश्रू', 'जळलेला मोहोर' इ. कथांतून हे दिसते. वि. स. खांडेकरांनी रूपककथा लिहिल्या. तसेच विनोदी कथा लिहिल्या. त्यांच्या 'कढीभात', 'मिसकांचन', 'सुपारीचे खांड' इ. कथा महत्त्वाच्या आहेत.

**य. गो. जोशी-**

य. गो. जोशी यांनी घरगुती वातावरणातील आणि कौटुंबिक जिव्हाळ्याचे उत्कटदर्शन सहजपणे घडवणारी गोष्टीरूप कथा निर्माण केली. त्या १९२९ मध्ये 'यशवंत' या मासिकात 'एक रुपया दोन आणे' ही कथा प्रसिद्ध झाली. 'शेवग्याच्या शेंगा', 'सुपारी', 'धर्म ही अफू आहे' ह्या त्यांच्या दमदार कथा आहेत. त्यांनी कौटुंबिक जिव्हाळ्याच्या कथा लिहिल्या. जोशी यांनी बहुधा मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनातील जीवनमूल्यांचे व्यावहारिक उपमा वापरून यशस्वी चित्रण केले. त्यांची कथा पाल्हाळामुळे लघुनिबंधाकडे अधिक झुकलेली दिसते. 'ग्यानबा तुकाराम' व 'टेकनिक' या कथांत तत्कालीन आलेल्या तंत्रवादावर ताशेरे ओढले आहेत. त्यांच्या कथा पाल्हाळीक असल्या तरी त्या हृदयंगम जिव्हाळ्याच्या आहेत. 'राहिलेले शूद्र', 'समोर पाहणारी मुलगी' इ. कथा या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

**वि. वि. बोकील-**

वि. वि. बोकील यांनी १९२९ साली 'यशवंत' मासिकात 'बेबी' ही दीर्घकथा लिहिली. सामाजिक अज्ञानातून निर्माण झालेल्या रूढीवर, तिच्या हास्यास्पदतेवर त्यांनी उपरोधातून नेमके बोट ठेवले. त्यांच्या पात्रांच्या तोंडी मार्मिक संवाद आहेत. तंत्राचा बडेजावपणा नाही. 'हक्काची जाणीव', 'तारेचा संसार', 'जमीन आणि अस्मान' इत्यादी कथा महत्त्वाच्या आहेत. १९४० नंतर त्यांच्या कथासृष्टीला खरा बहर आला. ती खऱ्या अर्थाने व्यापक बनली. उदा. 'भिकारडा', 'कोडाची मुलगी', 'जग कुणाचे' इत्यादी कथा पाहण्यासारख्या आहेत.

**द. रा. कवठेकर-**

मध्यमवर्गीय कुटुंबाचे चित्रण करणारे द. रा. कवठेकर यांच्या चित्रणाला कारुण्याची गडद किनार असते. कुटुंबातले नातेसंबंध ही ठरावीक प्रकारचे असतात. 'सुनांना छळणारी सासू, सासुला जीव नकोसा करणारी सून, पोरक्या पोरांचे हाल करणारे नातेवाईक, पत्नीवर स्वामित्व गाजविणारे नवरे' असे विषय त्यांच्या कथेचे आहेत. भावनिक पातळीवरच्या परिणामांची रुची ज्यांच्यात निर्माण झाली आहे अशा वाचकांना कवठेकरांच्या कथांची एक प्रकारे चटक लागली होती. उदा. 'दगडावरची रेघ', 'तिळाच्या वड्या' यांसारख्या कथा उल्लेखनीय आहेत.

## सत्य-अभिरुची कालखंड

### नवकथेची वाटचाल-

या कालखंडातील सर्वच साहित्यावर दुसऱ्या महायुद्धाचा अप्रत्यक्ष प्रभाव पडलेला दिसतो. विजयासाठी माणूस कोणत्याही थराला जाऊ शकतो. सत्तेसाठी कल्पनातीत निर्घृण बनू शकतो. या सत्यामुळे दुरूनही भयावह वाटणाऱ्या युद्धाच्या कथांनी माणसाच्या एकूण मनोविश्वाबद्दल, स्वभावाबद्दल, त्यांच्या नियतीबद्दल, संवेदनशील मनाला साशंक केले होते. सुष्ट व दुष्ट अशा दोन परस्परविरोधी व्यक्ती चित्रित करून समरप्रसंग निर्माण करण्यापेक्षा एकाच व्यक्तीच्या मनातील या द्विविधा संघर्षाचे प्रभावी चित्रण नवकथेने केले. व्यक्ति चित्रणातील या सूक्ष्मतेने आमूलाग्र बदल घडवून आणले. नवकथा ही त्यापूर्वीच्या लघुकथेचे उत्क्रांत रूप आहे. नवकथेचा परीघ इतका व्यापक आहे की, त्यात जीवनातील जवळजवळ सर्व गोष्टींचा समावेश झाला आहे.

नवकथेचे प्रवर्तक म्हणून गाडगीळ, गोखले, भावे व माडगूळकर यांची नावे घेतली जातात. परंतु त्यांच्यापूर्वीच नवकथेच्या एकूण रूपबंधाच्या पाऊलखुणा कुसुमावती देशपांडे व वामन चोरघडे या कथाकारांच्या कथेत जाणवतात. कुसुमावती देशपांडे यांच्या 'दीपदान', 'दीपकळी', 'मोळी' या कथासंग्रहांतून एक गोष्ट लक्षात येते की, त्यांनी लघुकथेला वेगळे वळण दिले आहे. त्यांच्या कथेत चिंतनशीलता आणि काव्यमयता आढळते. स्त्रियांचे मन आणि त्यांची दु:खे हा त्यांच्या जिज्ञासेचा आणि सहानुभूतीचा विषय आहे. कुसुमावतींचा मूळपिंड कथालेखिकेचा नाही तर चिंतनात्मक ललित लेखिकेचा आहे. नवकथेच्या

अनेक वैशिष्ट्यांची चाहूल कुसुमावती देशपांडे यांच्या कथांतून दिसते. कथेत घटनाबद्ध कथानक पाहिजे असा आग्रह न ठेवणे, व्यक्तिदर्शन आणि त्यातही व्यक्तीमनातली आंदोलने म्हणजे माणसाचे मूलभूत जीवन अशी धारणा बाळगणे, भाषाशैली ही विषयानुसार असावी, प्रमाणित असण्याचे कारण नाही अशी लेखनाची नवी रीत आत्मसात करणे, संयम, सूचकता हे साहित्याचे प्रधान गुण असावेत, असा प्रयत्न करणे, सर्व प्रकारच्या सांकेतिकतेतून कथेला मोकळे करणे ही वैशिष्ट्ये कुसुमावती देशपांडे यांच्या कथेतून प्रथम एकत्रित आलेली दिसतात.

**वामन चोरघडे-**

'सुषमा', 'हवन', 'यौवन', 'प्रस्थान', 'संस्कार', 'मजल' आणि 'बेला' हे चोरघड्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. हे संपूर्ण कथा वाङ्मय अभ्यासिले तर त्यांच्या कथेचा निराळेपणा, वेगळे व्यक्तिमत्त्व सहज लक्षात येते. आत्मपरता हा या कथेचा वेगळा विशेष आहे. त्यांच्या कथांतून निवेदन करण्यासाठी 'मी' उभा असतो. 'देवाच्या शाळा', 'आपुले मरण नयनी सोहळा' अशा कथांतून वामन चोरघडे डोकावतात. चोरघड्यांच्या पुष्कळ कथांची जडण-घडण लोक वाङ्मयाने संस्कारित झाली आहे. उदा. 'पुनर्जन्म', 'कष्टाची कहाणी', 'महायात्रा'. चोरघड्यांच्या कथेवर ग्रामीण जीवनाचे संस्कार खोल आहेत. उदा. 'हादरा', 'अतिथी देवो भव', 'गोरी बायको' या कथा गावाच्या जीवनाशी एकरूप झालेल्या आहेत. हे ह्या कथांतून लक्षात येते. 'मातीची भांडी' या कथेतून त्यांनी पोटासाठी आलेली लाचारी चित्रित केली आहे. त्यांनी कथेला कथानक प्रधानतेच्या कोंडीतून व तंत्राच्या चौकटीतून सोडविण्याचे कार्य केले.

चोरघड्यांच्या कथेला संवादाचे विशेष वेड आहे. त्यांचे संवाद खटकेबाज असतात. त्यांच्या कथा चिंतनशील असतात.

**गंगाधर गाडगीळ-**

१९४५ नंतर गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे आणि व्यंकटेश माडगूळकर यांनी कथेत अंतर्बाह्य बदल घडवून आणले. गाडगिळांची १९४० साली 'प्रिया आणि मांजर' ही पहिली कथा प्रसिद्ध झाली. गाडगिळांच्या कथेत माणसाचे मन केंद्रस्थानी आहे. त्याच्या बाह्य- व्यापारांच्या गाभ्याशी असलेल्या मानसिकतेचा वेध अतिशय सखोलपणे घेण्याचा प्रयत्न गाडगिळांनी केला. 'किडलेली माणसे', 'उन्हाळा', 'खरं सांगायचं म्हणजे', 'बिन चेहऱ्याची संध्याकाळ' इ. कथा महत्त्वाच्या आहेत. 'अगडबंब', 'विदूषक', 'जपमाळ' या कथासंग्रहांतून मानसिक विकृतीचे क्रूर, विसंगत व विनोदी दर्शन घडविले आहे. 'अपघात' या कथेत जीवनाचा मनोविश्लेषणात्मक आविष्कार येतो. त्यांनी सामाजिक प्रश्नाला वाचा फोडताना पत्करलेली तटस्थतेची भूमिका मन स्तिमित करणारी आहे. उदा. 'बकुळा'. गंगाधर गाडगीळ यांनी आपल्या कथेत संज्ञाप्रवाह, स्वप्नप्रणाली, फँटसी इत्यादी विविध शैलींचा वापर केला आहे. माणसांच्या विविध रुपांचे दर्शन घडविण्याचा सतत प्रयत्न केला आणि हे घडवत असताना साचेबंद विचार प्रणालीचे जोखड त्यांनी फेकून दिले.

**अरविंद गोखले-**

अरविंद गोखले यांच्या कथेतील जीवनविषयक दृष्टिकोन आशावादी आहे. १९४५ च्या 'सत्यकथेत' प्रसिद्ध झालेली त्यांची

'कोकराची कथा' ही नवकथेची नांदी ठरली. व्यक्तीला केंद्रस्थानी मानून लेखन करणाऱ्या गोखल्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सूक्ष्म मनोविश्लेषण कौशल्य. वडारवाड्यातील सुन्कीपासून तर कलावंताच्या जीवनातील विवंचनांपर्यंत पात्रांच्या आणि विषयांच्या बहुविधतेने त्यांची कथासृष्टी समृद्ध आहे. गोखले परमनप्रवेश करून पात्रांचे सुखदु:ख आपलेसे करतात. मूक भावनांना वाचा फोडण्याचे काम त्यांची कथा करते. उदा. 'जान्हवी' ही कथा या दृष्टीने पाहता येईल. गोखलेंची कथा चमत्कृतीवर आधारलेली असते. माणसातील विचित्रपणा, वेगळेपणा, विक्षिप्तपणा शोधण्याकडे त्यांची प्रवृत्ती असते.

**पु. भा. भावे-**

पु. भा. भावे यांच्या कथेत जीवनाचे चित्रण करताना बेडरपणा, काव्यात्मकता, ओजस्वीपणा व विलक्षण वेग इ. गोष्टी आलेल्या दिसतात. या चित्रणातील त्यांची धारणा व्यक्तीच्या स्वतंत्र मुक्त जीवनाची होती. पण त्याचबरोबर या आवेगाने बदलणाऱ्या संदर्भात सनातन भारतीय सांस्कृतिक मूल्यांची नवी रूपे शोधण्याचा व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भावे करीत होते.

त्यासाठी भाषा शैलीतील जोम व हळुवारपणा यांची अप्रतिहत आवर्तने त्यांच्या लेखणीने घेतली. उदा. 'ध्यास','रूप' या कथासंग्रहांतून हे दिसून येते. पु. भा. भावे यांची 'सतरावे वर्ष' ही वैशिष्ट्यपूर्ण कथा आहे. येथे कामवासना व प्रीती या जीवनाच्या अपरिहार्य अवस्थेचे चित्रण केले आहे. भावे यांच्या कथेत कथा आकर्षण असते आणि शृंगारही येतो; पण त्याला संयमाची जोड असते.

त्यांची पात्रे भोगापेक्षा त्यागाला महत्त्व देताना दिसतात. उदा. 'संस्कार' ही कथा. भावेंची शैली अलंकारयुक्त आहे. वर्णनात भावनोत्कटता येते आणि म्हणूनच ती वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'स्वप्न' ही कथा .भावे एकपदरी माणसाच्या उत्कट मनोवृत्तीचे शब्दचित्र अतिशय प्रवाही व आवेगमयी भाषेत मांडू शकतात. 'बंगला', 'सावल्या', 'मुक्ती', 'वैरी', 'देव्हारा','हिमाणी', 'गूढकथा', 'ओवाळणी' इत्यादी कथासंग्रहांतून त्यांचे नवविचारमंथन झाले आहे.

**जी. ए. कुलकर्णी-**

जी. ए. आपल्या कथेतून मानवी जीवनाला ग्रासणारी दु:खे प्रतिकांच्या माध्यमातून उभी करतात. मानवी जीवनातील अर्थशून्यतेबरोबरच समाजातील भीषणताही ते चित्रित करतात. त्यांची कथा तत्त्वज्ञानात अधिक रमणारी आहे. 'माणसाचे काय, माकडाचे काय ?' या कथेत ते काव्यात्म व तत्त्वमग्न बनले आहेत. त्यांची 'माणूस नावाचे बेट' ही कथा सत्यकथेत प्रसिद्ध झाली. जी. एं. च्या कथांतील प्रतिमांची सजीवसृष्टी ही स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरावा इतकी गडद आहे. रोगी, डॉक्टर आणि नर्स या सर्वांच्या वैयक्तिक व सामुदायिक आयुष्यांची एकत्र बांधलेली नियती जी. ए. 'वस्त्र' या कथेत साकार करतात. जी. ए. बीभत्स जीवनासक्तीची आणि लालसेची वर्णने करतात. जी.एं. ची कथा निसर्गाची विविध रूपे, प्राणी सृष्टी, वनस्पती, अनेक थरांवरील स्त्रीपुरुष यांनी गजबजलेली आहे. 'चंद्रावळ' ही कथा लक्षात घेतल्यावर लक्षात येते की, जी. ए. जीवनाला ग्रासणारी दारुण दु:खे प्रतिकांच्या माध्यमातून विविध रूपांत उभी करतात. उदा. 'निळा सावळा'

या कथासंग्रहातील 'चंद्रावळ', 'राणी', 'अवशेष' इ. कथा महत्त्वाच्या आहेत. त्यांच्या संग्रहांना दिलेल्या शीर्षकांत रंगासक्ती जाणवते. जसे 'निळा सावळा', 'हिरवेरावे', 'रक्तचंदन', 'काजळमाया' तर 'पारवा', 'रमलखुणा', 'सांजकुशन', 'पिंगळावेळ' या शीर्षकांत अर्थघनतेचा प्रत्यय येतो.

**ग्रामीण कथा :-**

ग्रामीण कथा स्वातंत्र्यपूर्व कालखंडात काही प्रमाणात लिहिली गेली; पण तिच्याद्वारा ग्रामीण जीवनातील बहुविध स्तरांतील मागासलेपणा, अज्ञान, शोषण, विसंगती, निसर्गाचे आगळेपण, स्त्रीपुरुष संबंध हेरून तिचा नागर मनाला क्षणभर विरंगुळा व्हावा यासाठी निर्मिती झाली. १८९७ मध्ये महाराष्ट्रात पडलेला दुष्काळ या पार्श्वभूमीवर हरिभाऊ आपटे यांनी 'काळ तर मोठा कठीण आला ' ही ग्रामीण कथा लिहिली. ग्रामीण जीवन चित्रण वि. स. सुखठणकर यांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या कथा संग्रहातील कथा महत्त्वाच्या आहेत. १९२० नंतर गांधीयुग सुरू झाले. त्यांच्या विचारांचा पगडा अवतीभोवतीच्या जीवनावर उमटलेला जाणवतो. सुखठणकरांनी व लक्ष्मणराव सरदेसाई यांनी गोमंतकीय प्रादेशिक कथा लिहिल्या. 'कल्पवृक्षाच्या छायेत', 'सागराच्या लाटा' इ. कथा संग्रहांतील कथा या दृष्टीने पाहता येतील. १८४० साली श्री. म. माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' या कथासंग्रहात माणसाचे माणूस म्हणून असणारे मोल हे सत्य मानून कथालेखन केले. १९५५ नंतर मात्र मराठी ग्रामीण कथा अंगाअंगांनी बहरू लागली. गो. नी. दांडेकर व श्री. ना. पेंडसे हे

प्रादेशिक ग्रामीण जीवन आपल्या कथांमधून चित्रित करू लागले.

**द. मा. मिरासदार-**

द. मा. मिरासदार हे मराठी ग्रामीण कथेतील विनोदी कथाकार म्हणून प्रसिद्ध असले, तरी ग्रामीण जीवनातील दु:खद जाणिवा व अतूट निसर्ग यांचे ते रेखीव चित्रण करतात. 'विरंगुळा', 'पाऊस' ,'भोग' या कथांतून दारिद्र्याने पिचलेल्या दु:खद जीवनाची जाणीव करून देतात. द. मा. मिरासदारांच्या कथांचा शेवट हा परिणामकारक असतो आणि कथेत वर्णन करताना ते बारीक- सारीक घटनांचा उल्लेख तपशीलवार करतात. निवेदन करताना ग्रामीण बोलीचा वापर करतात.

**शंकर पाटील-**

शंकर पाटीलांचे लेखन स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आहे. ग्रामीण नवकथेच्या स्थित्यंतरात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. 'वळीव' 'भेटीगाठी', 'आभाळ', 'धिंड', 'ऊन', 'वावरी शेंग', 'पाहुणी' अशा कित्येक चांगल्या कथा यात समाविष्ट आहेत. कालपरत्वे बदलणारे ग्रामीण जीवनाचे चित्रण शंकर पाटील करतात. कौटुंबिक नात्याचे भावपूर्ण चित्रण ते रेखाटतात. उदा. 'भेटीगाठी', 'फक्कड गोष्ट.' पाटील यांच्या कथेत ग्रामीण जीवनातील वैशिष्ट्ये आहेत. जातीय उच्चनीचता, हेवेदावे, जुना गावगाडा, राजकारण्यांच्या नाना खेळ्या, दारिद्र्य, अज्ञान यांनी ग्रस्त ग्रामीण जीवन यांचे ते वर्णन करतात. निसर्ग आणि ग्रामीण जीवनाची असणारी जवळीक कथेत येते. शंकर पाटीलांच्या कथा बहुरंगी, बहुढंगी आहेत. त्यामुळे कथा वाङ्मयात मोलाची भर पडलेली आहे.

याच कालखंडात विशेष कामगिरी बजावणारे लेखक म्हणजे रणजित देसाई. त्यांच्या कथाविश्वात कोल्हापूर व आसपासचा ग्रामीण परिसर येतो. 'कणव' (१९६०) संग्रहातील 'चाकोरी' व 'रुप्याचे डोळे' या कथा ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवितात. 'आहुती' ,'मरण' या कथांतून पारंपरिक ब्राह्मणवर्गाचे दैन्य व त्यांच्या समस्या याकडे लक्ष वेधले आहे.

ग. दि. माडगूळकर यांनी ग्रामीण जीवनावर कथा लिहिल्या. त्यांच्या कथेत शैलीप्रवाह आहे. निवेदनात सहजता आहे. माडगूळकर यांच्या कथेतली मुले खायला काहीच नाही म्हणून दिव्याच्या चिमणीवर हळकुंड भाजून खातात असे दाखविले आहे. 'काय सुदीक गेलं नाही' यात दारिद्र्य रेखाटले आहे.

आनंद यादव यांच्या कथेत ग्रामीण मन चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. 'खळाळ' हा त्याचा पहिला कथासंग्रह. 'मोट', 'धुणे' कथांतून ग्रामीण जीवनाचे एक व्याकूळ आकलन दिसते. या कथांतून नादतत्त्वाचा प्रत्यय येतो. निवेदन वेगळे आहे. त्यामुळे ग्रामीण कथेला मराठीत एक नवे रूप दिल्याचे जाणवते. 'खळाळ' हा त्यांचा कथासंग्रह महत्त्वाचा आहे.

महादेव मोरे यांचे कथालेखन ग्रामीण जीवनाचे नवेनवे भाग समोर आणताना दिसते. निपाणीच्या आसपासचे तंबाखूच्या धंद्यातले कामगार, टॅक्सी, ट्रक, धंद्यातले ड्रायव्हर क्लिनर, मालक, एजंट यांच्या जीवनातील कर्मकहाणी मोरे यांनी चित्रित केली आहे. याच कालखंडातील सखा कलाल यांचा 'ढग' हा कथासंग्रह महत्त्वाचा आहे.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**दलितकथा :-**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात मराठी साहित्यात जो एक जोरदार प्रवाह निर्माण झाला तो म्हणजे दलित साहित्याचा. दलितांवर अन्याय करणारे सवर्ण आणि त्यांचा अन्याय निमूटपणे सहन करणारे 'दलित' अशा व्याख्याच तयार झाल्या. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' असे सांगणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने जागी झालेली माणसे शिकू लागली. आपले दु:ख व्यक्त करण्यासाठी कथा, कादंबरी, कविता, आत्मचरित्र या साहित्य प्रकारांचा वापर करू लागली. मराठी दलित कथेचा उगम हा परिस्थितीत आणि प्रवृत्तीत आहे. शिकलेल्या लोकांनी प्रस्थापितांच्याविषयीचा विद्रोह प्रकट करायला सुरुवात केली.

या अगोदर श्री. म. माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' व 'माणुसकीचा गहिवर' या कथासंग्रहांतील कथांद्वारे तळागाळातील लोकांची दु:खे चित्रित केली होती.

दारिद्र्य, गलिच्छ वस्त्या आणि खालच्या जातीत जन्माला आलो, म्हणून समाजाकडून दुर्लक्षित झालेले माणसाचे जीवन अण्णा भाऊ साठे यांनी कथेतून मांडले. माणसे पोटासाठी काहीही करतील. माणसाला 'भूक' ही महत्त्वाची चिंता आहे. त्यासाठी तो माणूस काहीही करेल. 'स्मशानातलं सोनं', 'कोंबडी चोर','शिकार', 'मकुलमुलाणी' या कथेतील माणसे पशूच्या जीवनापलीकडचे जीवन जगतात असे दाखविले आहे.

शंकरराव खरात यांनी १९५९ साली 'बारा बलुतेदार' या कथासंग्रहाद्वारे ग्रामीण समाजातील समाज व्यवस्था, त्यात महत्त्वाचे असणारे

महार, मांग, रामोशी, परीट यांचे कधीही न प्रकाशात आलेले जीवन चितारले आहे. हे त्यांच्या 'दौंडी', 'सांगावा' या कथासंग्रहांतून जाणवते.

बाबूराव बागुल यांनी महाराष्ट्रातील दलितांच्या व्यथा आपल्या कथेतून मांडल्या आहेत. 'जेव्हा मी जात चोरली होती' व 'मरण स्वस्त होत आहे' या कथासंग्रहांमधून सामाजिक, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या खालच्या स्तरातील माणसांची दु:खे चित्रित केली आहेत.

चारूता सागर यांच्या कथेत डोंबारी, कोल्हाटी, जोगती यांच्या जीवनावरील कथा येतात. उदा. 'दर्शन' ही कथा. या वरील कथाकारांप्रमाणेच दया पवार, योगीराज वाघमारे, भीमराव शिरवाळे इ. लेखकांनी लेखन केले आहे. वामन होवाळ गावरान जीवनाचे गंभीर दर्शन घडविताना दिसतात. 'अंगारा', 'येळकोट', 'बेनवाड' ह्या कथासंग्रहांवरून हे लक्षात येते. अमिताभ यांचा 'पड' हा कथासंग्रहही महत्त्वाचा आहे. या कथासंग्रहावरून समाज व्यवस्था आणि समाजातील लोकांच्या वृत्ती -प्रवृत्ती याकडे लक्ष वेधले आहे व त्याचे वैशिष्ट्यपूर्ण लेखन केले आहे.

१९६० नंतरच्या कथा ह्या घटनाप्रधान आहेत. १९६० नंतरच्या कथेचे वैशिष्ट्य म्हणजे या काळातील लेखकांनी कथांतून विघटनशील कुटुंब व्यवस्थेतील तुटणाऱ्या, झुकणाऱ्या, इतस्तत: विखुरल्या जाणाऱ्या भावबंधांचा व माणसामाणसातील संबंधांचा शोध मोठ्या प्रमाणावर घेतला आहे. समकालीन मराठी कथा वाङ्‌मय हे तत्कालीन सामाजिक जीवनाशी निगडित आहे. दुसऱ्या महायुद्धाने पार ढासळलेली मानवी मूल्ये व विनाशाच्या भीतीने संपूर्ण जगच हबकून गेले होते. या संदर्भात मर्ढेकर,

गाडगिळांनी लेखन केले. समाजातील व व्यक्तीच्या अंतरंगातील चांगल्या वाईट घटना पाहून विविध पातळ्यांवर त्यांचे दर्शन घडविले. जी. ए., कमलदेसाई, चित्रे, खानोलकर यांनी या नव्या जाणिवेचा शोध व वेध घेऊन मराठी कथेला अधिक समृद्धीकडे नेले. जी. ए. कुलकर्णी या ताकदीच्या कथाकाराने या वाटेवरून केलेली वाटचाल नवीन होती. वेदनेची विविध रूपे जी. एं. च्या कथांत विखुरलेली होती. तेथील वेदनेची तडफड मन अस्वस्थ्य करणारी होती. त्यांचे लेखन आशयघन कथानिर्मिती करून गेले. प्रतिमांचा योग्य वापर त्यांच्या कथेतील शोकात्म अनुभवाला अधिक गडद करतो. त्यांचे वातावरण निर्मितीचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. व्यक्तिचित्रण आणि मनोविश्लेषण यांचा सुयोग्य वापर ते करतात. मनोविश्लेषणाच्या अतिरिक्त वापरामुळे येणारा एकारलेपणाही ते टाळतात. त्यांच्या कथा प्रामुख्याने घटनाप्रधान आहेत. १९७० नंतरच्या कथेमध्ये ही विघटनशीलता जास्त जाणवते. कारण औद्योगिकीकरण व त्यातून जीवनात आलेला एक प्रकारचा यांत्रिकपणा यामुळे बाह्यत: माणसे जवळ आली; पण त्यांच्यातील संबंध मात्र औपचारिक व तिरकस होऊ लागले. औद्योगिकीकरण व यांत्रिकता यांमधून निर्माण झालेल्या मानवी समस्या सोडविणे कठीण झाल्याने जीवनाकडे अनास्थेने पाहण्याची वृत्ती निर्माण झाली आहे.

नवकथाकारांनी मनोरंजनात्मक, ध्येयवादी, आदर्शवादी कथा न लिहिता अनुभवगर्भकथा लिहिल्या. याशिवाय नवकथाही अंतर्मुख बनली. मराठी लघुकथेच्या स्थित्यंतरांतील सुरुवातीची नवकथा ही नवप्रवृत्ती व नव्या आकृतिबंधासह पुढे आली. दुसऱ्या महायुद्धानंतर

तडा गेलेली जीवनमूल्ये, विध्वंसक जीवनमूल्ये साहित्यात जशीच्या तशी अवतीर्ण झाली. भावना व्यक्त करण्यासाठी भाषेला हवी तशी न वाकवता भाषा जशीच्या तशी मांडली गेली. त्यावेळपासूनच नवकथेचा जन्म झाला. कथेत फ्रॉईडच्या मानसशास्त्राचा वापर करून मनोविश्लेषणात्मक कथांचा जन्म झाला. जीवनातील विदारक सत्य मांडण्यासाठी प्रतिमांचा वापर करण्यात आला. चांगले- वाईट, श्लील- अश्लील, सुष्ट- दुष्ट, सुरूप- विरूप इ. चा विचार न करता नीतिनिरपेक्ष दृष्टिकोनातून त्यांनी आपले अनुभव मांडले. जीवनातील वास्तव सत्य धैर्याने मांडण्याचा प्रयत्न नवसाहित्यातून झाला.

या काळात स्त्री लेखिकांनी कथालेखन केले आहे. स्त्रीने आपल्या स्त्रीत्वाच्या पलीकडे जाऊन स्वत:चा माणूस म्हणून विचार करायला सुरुवात केली.

### १) विद्याधर पुंडलिक व पानवलकर

विद्याधर पुंडलिक यांच्या कथा १९६० नंतरच्या आहेत. 'पोपटी चौकट' (१९६२) व 'टेकडीवरचे पीस' (१९६९) हे त्यांचे कथासंग्रह होत. त्यांच्या कथा कुटुंबकथा आहेत; पण नात्याचे चित्रण ते पारंपरिक चष्म्यातून करीत नाहीत. कथालेखन करताना पुंडलिक भावविवश होत नाहीत. घटनांमागून घटना कथन करत असताना भाष्य अथवा उपदेश करण्याचा मोहही ते टाळतात. 'ऐलतीर', 'वाट' इत्यादी कथांतील वैशिष्ट्ये म्हणजे माणसांचे आयुष्य हे न उलगडणारे कोडेच असते असे चित्रण यात आले आहे. दु:खाचे वेगवेगळे पदर उलगडत, जीवनाचे कोडे हळुवारपणे सोडविण्याचा प्रयत्न पुंडलिक आपल्या कथांमधून

करताना दिसतात. स्त्रीची विविध रूपे साकार करण्याचे पुंडलिकांचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे.

पानवलकर यांच्या नावावर 'गजगा' (जाने. १९६३), 'औदुंबर' (१९६३), 'सूर्य' (१९६८) हे कथासंग्रह आहेत. पुंडलिकांच्या कथेपेक्षा यांच्या कथेचा पिंड वेगळा आहे. पुंडलिकांची कथा व्यक्तिप्रधान, भावनोत्कट व तरल अनुभव चितारणारी तर पानवलकरांची कथा रंगेल व काहीशी दांडगी आहे. पुंडलिकांची माणसे निष्ठावान, हळवी, पाप- पुण्याचा विचार करणारी, तर पानवलकरांची व्यवहारी, जगाचे टक्के टोणपे खाऊन पक्की झालेली. पानवलकरांची कथा घराबाहेर घडणारी आहे. त्यांची बहुतेक पात्रे घरे सोडून नशीब आजमावण्यास निघालेली असतात. उदा. औदुंबर, श्रीमंताचा वस्तरा.

### २) जयवंत दळवी-

'चक्र' कार दळवी यांनी कथालेखन केले आहे. 'महिवर', 'एदीन', 'जळातील मासा', 'आश्रम', 'फजितवाडा' ह्यांसारख्या विनोदी कथा त्यांनी लिहिल्या.'प्रेम' हा दळवींच्या कथांचा विषय आहे.

### ३) अनंत जातेगावकर-

अनंत जातेगावकरांनी मोजक्याच कथा लिहिल्या. 'रान', 'मुखवटे' (१९६९) या कथा 'सत्यकथे'त प्रसिद्ध झाल्या. गुलमोहर (दिवाळी १९६९), 'घर' , 'पावल' (१९७०) इ.

१९६० नंतरच्या कालखंडात अनेक प्रवृत्ती आल्या. साहित्याच्या क्षेत्रात अनेक बदल जाणवू लागले. बदलती सामाजिक मूल्ये, विभक्त कुटुंब पद्धती, भ्रष्टाचार, गरिबी, लोकसंख्येत वाढ, महागाई इत्यादी.

या सर्व बाबींचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बदलांचा परिणाम अर्थातच साहित्यावर झालेला दिसून येतो. १९६० नंतरच्या कथालेखनात बरेच बदल झाले. मनोरंजनात्मक ,ध्येयवादी, आदर्शवादी कथा न लिहिता अनुभवगर्भकथा लिहिण्याकडे लेखकांचा कल वाढलेला जाणवतो. महत्त्वाचे म्हणजे स्त्री लेखन भरपूर झाले.१९६७ नंतर देशात व प्रामुख्याने महाराष्ट्रात स्त्री मुक्तीचा विचार व आंदोलने सुरू झाली. स्त्रीने आपल्या स्त्रीत्वाच्या पलीकडे जाऊन स्वत:चा माणूस म्हणून विचार करायला सुरुवात केली. नवऱ्याची अरेरावी, कुटुंबातील दुय्यम स्थान, घरकाम इ. नैसर्गिक वाटणाऱ्या गोष्टींतून बाहेर पडून ती आपला मार्ग शोधू लागली. स्वत:चे अस्तित्व शोधू लागली. पुरुषाप्रमाणे स्त्रीला देखील एक मन आहे, तीही एक माणूस आहे ही जाणीव स्त्रीच्या ठिकाणी निर्माण झाली. त्या जाणिवेतून ती लेखन करू लागली.

**१) कमल देसाई-**

१९६० नंतरचे महत्त्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण लेखन करणाऱ्या या कथा लेखिका होत. 'रंग' हा एक कथासंग्रह व आणखी दोन- चार कथा एवढेच साहित्य आहे. कमल देसाईंचे साहित्य लेखन जरी कमी असले तरी त्यांनी अत्यंत अभिनव अशी कथनशैली वापरून सर्वांना अपरिमित अशी कलाकृती निर्माण केली. त्यांच्या कथेतील घटनांची रचना सरळ रेषेत नसते, ती उलट सुलट चक्राकार असते. कमल देसाईंची शैली ही विशेष घाट घेऊन जन्माला आलेली आहे. त्यांच्या कथा सर्वसामान्य वाचकास दुर्बोध वाटतात, पण जाणकार वाचकास विचारप्रवृत्त करतात. कमल बाईंची कथा एकाच वेळी अनेक पातळ्यांवरून व तिन्ही काळातून सरकत जाते. त्यामुळे रचनादृष्ट्या ती

गुंतागुंतीची वाटते. त्यांच्या कथा ह्या व्यक्ती केंद्री असल्याने कथा आत्मलक्षी आहेत. कमल देसाईंच्या कथेतील नायिका ह्या स्वतंत्र वृत्तीच्या, मी केंद्री, आपल्या व्यथा मनात कोंडून ठेवणाऱ्या, जगण्याची प्रबळ इच्छाशक्ती असणाऱ्या आहेत. कमल देसाईंनी नव अनुभव घेऊन ते साहित्यातून मांडले. यासाठी त्यांनी रूढ सारखी सामाजिक मूल्ये नाकारली. त्यांच्या कथेतून जीवनातील अर्थशून्यता, माणसाचे एकाकीपण स्पष्ट होते. डॉ. इंदूमती शेवडे यांच्या मते या कथेत "जगण्यातला एकटेपणा, विसंगती, वैफल्य जाणवते."

**२) तारा वनारसे-**

'पश्चिमकडा' (१९६३) हा त्यांचा पहिला कथासंग्रह होय. ताराबाईंच्या कथेत मानवी भावछटांचे चित्रण केले आहे. त्यांच्या कथेतील पात्रे ही कुठल्या तरी दु:खाने कुढत बसणारी , दु:ख मनात जपून ठेवणारी, ताणलेल्या मन:स्थितीत वावरणारी अशी आहेत. तारा वनारसे यांच्या कथा प्रामुख्याने भावनाप्रधान असून लहानशा अनुभवातून खूप मोठा अर्थ सांगण्याचे सामर्थ्य त्यांच्या कथेत आहे.

**३) विजया राजाध्यक्ष-**

विजया राजाध्यक्ष यांच्या कथांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. स्त्रियांना येणारे अनुभव त्यांनी आपल्या कथांतून मांडले आहेत. 'अधांतर' (१९६५), 'टिंबे' (१९६५), 'अनोळखी' (१९७३) व 'विदेही' (१९७२) हे कथासंग्रह आहेत. 'अधांतर' या कथासंग्रहात प्रतिमा व प्रतिकांचा वापर केलेला दिसून येतो. त्यांच्या कथेचे वैशिष्ट्य म्हणजे कथेचे शीर्षक म्हणजे एक प्रतीकच होय. त्यांच्या कथांच्या

रचनातंत्रात विविधता आणि अभिव्यक्तीतील वेधकता दिसून येते. विजया राजाध्यक्ष यांच्या कथा ह्या अनुभवातून व आजूबाजूच्या पाहिलेल्या जीवनातून साकार झाल्या असाव्यात.

विजया राजाध्यक्ष यांच्या कथा व्यक्तिमनाच्या वेगवेगळ्या सूक्ष्म छटा प्रकट करतात. यासाठी मनोविश्लेषण येते. विजयाबाईच्या कथेतील माणसे सर्वसामान्य माणसांपेक्षा वेगळी आहेत. उदा. 'अंतराळ', 'जन्म', 'कवच', 'शोरूम','कमळ', 'देह' या कथांतून त्याचा प्रत्यय येतो.

### ४) गौरी देशपांडे-

गौरी देशपांडे यांच्या कथा 'सत्यकथेतून' प्रकाशित होत होत्या. 'एकेक पान गळावया' व 'आहे हे असं आहे' हे त्यांचे कथासंग्रह. गौरी देशपांडे यांच्या कथांतून पांढरपेशा स्त्रीच्या जीवनाचे चित्रण केले आहे. त्यांच्या कथा आटोपशीर असतात. तसेच भावना, प्रसंग, मनाची एखादी वृत्ती- प्रवृत्ती त्या चित्रित करीत जातात. उदा. 'एका भांडणाचा शेवट' मधील 'मी' आणि 'तू' हे दोघेही परस्पर विसंवादी आहेत. 'सवय' ही एका परित्यक्तेची कथा आहे. गौरी देशपांडे यांच्या कथेतील स्त्री ही जागृत आहे. तिला स्वत:च्या हक्काविषयी, व्यक्तित्वाविषयी जाणीव आहे.

१९७० च्या काळात वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण कथा लिहिणारे श्रीराम गुंदेकर हे होत. १९७३-१९८८ या पंधरा वर्षांचा कालावधीमध्ये लिहिलेल्या आणि वेगवेगळ्या नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झालेल्या कथा महत्त्वाच्या आहेत. 'खंत' ही पहिली कथा तर 'कळप' ही शेवटची कथा. या काळात शिक्षण प्रसार वेगाने होत होता. गुंदेकरांच्या सर्वच कथांमध्ये दारिद्र्यग्रस्त ग्रामीण जीवनातली अगतिकता आढळते. त्यांच्या

कथेतील मथळे वाचूनदेखील या वस्तुस्थितीची जाणीव होईल. घालमेल, खंत, सुटका, फिकिर इ. मथळे बोलके आहेत. 'सोनकिडे' ही कथा भ्रष्ट नोकरशाही आणि राजकारणावरील बोलके भाष्य आहे.

दिलीप चित्रे यांच्या कथा नव्या दिशेने जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आहेत. "चित्र्यांचे कथाविश्व मोठे लोकविलक्षण व्यक्तींनी गजबजलेले आहे. या साऱ्या व्यक्ती अगदी एकाकी आहेत. माणसाचे एकाकीपण चित्रित करण्यासाठी चित्र्यांना जणू काही कवितेऐवजी कथेचा वेगळा कॅनव्हास घ्यावा लागला." [७] चित्र्यांच्या कथाविश्वात स्वप्नदृश्यांना फार महत्त्वाचे स्थान आहे. ही स्वप्नदृश्ये केवळ फॅशन म्हणून कथेत समाविष्ट केलेली नाहीत. या स्वप्नदृश्यांचा संबंध त्या व्यक्तीच्या मनातील कितीतरी घटनांशी असू शकतो. चित्र्यांची लेखन प्रवृत्ती निर्भय आहे.

१९७० नंतरची कथा विघटनशील वाटते. औद्योगिकीकरण व परिणामी जीवनात आलेली यांत्रिकता यांच्यात समन्वय साधणे मराठी मनाला कठीण झालेले आहे हे या कथांतून दाखविले आहे.

आजची मराठी कथा एका बाजूने 'शब्दचित्र' व 'रिपोर्ताज' यांच्या जवळ जात आहे. आजचा कथालेखक वेगवेगळ्या भाववृत्तींतून जीवनानुभव घेण्याचा प्रयत्न करतो. आजच्या कथेला वास्तवाचे आकर्षण आहे. मग ते अंतर्मनाचे वास्तव असो किवा केवळ चर्मचक्षूंना, इंद्रिय संवेदनांना जाणवणारे वास्तव असो. नाना प्रकारचे नवीन नाट्य व्यक्त करण्याचा ती एकसारखा प्रयत्न करीत आहे. व्यक्तिमनाचे साक्षातदर्शन घडविण्याचा प्रयत्न कथा करते. व्यक्तिमनाचे चित्रण हे तिच्यातून अनेकदा साधन रूप नव्हे तर प्रत्यक्ष साध्यरूप धारण करते. खेड्यातील

जीवनाचे चित्रण करू पाहणारी आजची कथा थोडी भावरंजित होते. ती मधून मधून मिश्किल बनते. आपणास हसवते पण तिच्यात वास्तवाचे कठोर दर्शन असते. आजची कथा ही कोणत्याही तंत्राच्या साच्यात बसणारी नाही. आपले स्वरूप साचेबंद न होऊ देण्यासाठी आजची लघुकथा जणू धडपड करत आहे.

आजची कथा ही अतिशय सूक्ष्म झाली आहे. परंतु तेच एक तिचे फार महत्त्वाचे सामर्थ्य आहे. अशी चुकीची समजूत करता कामा नये. गोष्ट, कहाणी, कथा इत्यादी तिची असंख्य रूपे आहेत आणि ती सर्वच महत्त्वाची आहेत. चांगल्या कथाकारांमध्ये मुद्दाम समाजाचे चित्रण करावयाचा असा प्रयत्न नसतो आणि समाजाचे चित्रण करण्याच्या प्रयत्नात बाह्य हालचालींचा व घटनांचाच आविष्कार होऊ शकतो. आजच्या युगात सामाजिक जाणिवांच्या पलीकडे गेलेली आणि नाना तऱ्हेचे ताणतणाव व त्यामुळे मनोगंडाने त्रस्त झालेली माणसे दाखविणे हे खरे समाजाचे चित्रण आहे. तसे न दाखविता अन्याय दाखविण्यासाठी छोट्या चिघळलेल्या वरवरच्या जखमा दाखविणाऱ्या कथा आज लिहिल्या जातात. त्यामुळे आजची कथा अगदी सरधोपट, बाळबोध होऊन गेलेली आहे.

**समारोप-**

विज्ञानाने माणसाने प्रगती केली खरी; पण माणूसच माणसापासून दुरावला, दुखावला गेला. दळणवळणाच्या साधनांची वाढ, तंत्रविषयक विकास झाला. औद्योगिक भरभराट झाली. तरीही माणसाला सुख मिळेनासे झाले. सुखी जीवन जगण्यासाठी अनेक गरजा निर्माण झाल्या. त्या गरजा भागविण्यासाठी हरतऱ्हेने प्रयत्न करण्याचा मानव विचार

करू लागला. त्यासाठी नीतिमूल्ये गुंडाळून ठेवलीत. यात मानवाचे माणूसपण हरवले गेले. उच्चवर्गीय, मध्यमवर्गीय, झोपडपट्टी या तिन्ही वर्गांत अनेक प्रश्न निर्माण झाले. हेच प्रश्न अनेक कथाकारांनी आपल्या कथेत मांडण्याचा प्रयत्न केला.

नवकथा, आशय, विषय व अभिव्यक्ती दृष्ट्या नावीन्यपूर्ण आहे. जी. ए., कमल देसाई, चि. त्र्यं. खानोलकर, भाऊ पाध्ये, विजय तेंडुलकर, गौरी देशपांडे, तारा वनारसे, विजया राजाध्यक्ष इ. कथाकारांनी जीवनातील विसंगती, अर्थशून्यता, नाट्यातील मतभेद उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला.

१९६० नंतरच्या कथेत सूक्ष्म मनोविश्लेषण, क्षणभंगूर भावनांचे प्राधान्यीकरण, संज्ञाप्रवाही चित्रण व नवनवीन घाटांचे प्रयोग आहेत. लेखकांनी मानवी जीवनातील बारकावे अचूक टिपून कथा लिहिल्या. कथेला जसे प्रोत्साहन मिळाले. कथेचा विकास घडवून आणण्यात जशा काही वाङ्मयीन प्रेरणा आहेत तसेच अवाङ्मयीन प्रेरणाही आहेत. नियतकालिकांच्या वाढत्या संख्येमुळे कथेला एक वाचक वर्गच मिळाला. नियतकालिकांच्या वाढत्या संख्येमुळे आटोपशीर व वाचनीय साहित्य प्रकार म्हणून कथेला मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

अनंत मनोहर यांच्या कथा १९६० नंतरच्या आहेत. मराठी कथेच्या प्रवाहात सामील झालेले लेखक म्हणजे अनंत मनोहर. त्यांचे कथासंग्रह 'देवकाठी', 'बिल्वपत्र' आणि 'कर्कोटक' हे आहेत. त्यांच्या कथांचे विशेष म्हणजे त्यांच्या कथांमध्ये कोकणी निसर्ग, कोकणी माणसांच्या वृत्ती प्रवृत्ती रेखाटल्या आहेत. तसेच त्यांच्या कथांतील

माणसे किंवा व्यक्ती या उच्चशिक्षित आहेत. सर्पजीवन हा नवीन प्रकार वाचकांच्या भेटीला येतो. तसेच ते स्त्रियांचे चित्रण खंबीरपणे करतात. उदा. 'लाट', 'वंशज', 'भूक' इ. कथा महत्त्वाच्या आहेत. व्यक्तिचित्रण करताना आपल्यासमोर ती व्यक्तीच उभी आहे असे वाटते. उदा. 'मोठ्या बाई' तील सुलोचना बाई.

अनंत मनोहर यांची कथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांनी मराठी कथेत महत्त्वाची भर घातली. कोकणातील निसर्गाचे वैशिष्ट्यपूर्ण वर्णन, माणसांच्या विविध वृत्ती - प्रवृत्ती यांनी त्यांची कथा साकार होते. त्यांच्या कथेतून निसर्ग आणि माणूस यांचा विशिष्ट संबंध चित्रित केलेला असतो. असा संबंध फारसा इतर कोणी चित्रित केलेला आढळत नाही. म्हणून त्यांच्या कथा अभ्यासनीय आहेत असे वाटते. पुढील प्रकरणांतून त्यांच्या कथेचा सविस्तर परामर्श घेतला आहे.

**संदर्भ :-**

१. शेवडे इंदुमती, : मराठी कथा : उगम आणि विकास, सोमय्या पब्लिकेशन प्रा. लि. मुंबई, द्वितीयावृत्ती, १९८२. पृ. ७.

२. उ.नि: पृ. क्र. ८.

३. संपादक कुलकर्णी गो. म., कुलकर्णी व. दि. : मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ६ वा, प्रकाशक : राजा फडणीस, प्रथमावृत्ती, २७ मे १९९१.

४. उ. नि.

५. बांदिवडेकर चंद्रकांत, : मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप, संपादक पवार गो. म., हातकणंगलेकर म. द, पृ. १३९.

६. फडके ना. सी. : प्रतिभा साधन, देशमुख आणि कंपनी, दहावी आवृत्ती, पुणे १९७०.

७. फडके भालचंद्र, : 'प्रतिष्ठान', सप्टेंबर १९७०.